# सुख

प्रकाशित:

०१ कुंभश्री दिवाळी अंक २०११ .

०२ अक्षर सिध्दी दिवाळी अंक २०१४


**रत्नाकर वाणी**

पुनरारंभ



© पुनरारंभ



**website:** http://www.rajratna.co.in **Email:** ratnakar.wani@rajratna.co.in

# सुख

सुख ही अशी गोष्ट नाही की, बाजारातून विकत आणता येते अथवा कोणाकडून उधार उसनवार घेता येते. कोणी कीतीही म्हटले की, मी सुखात आहे, ते त्याच्या चेह-यावरून व वर्त णुकीवरून दिसून येते तो किती सुखात आहे व त्याच्या बोलण्यात किती सत्यता आहे. सुख मानले तर सुख आहे अन्यथा दुःखच दुःख आहे. जिवनात सुख कमि तर दुःख जास्त आहे. दुःखाचा डोंगरच पुढे उभा आहे त्यात सुख शोधून सुख मानण्यातच खरे सुख आहे. म्हणतात ना "सुख पाहता जवा पाडे, दुःख पर्वता एवढे."

सुखाची व्याख्या करायची झाल्यास सुख म्हणजे एखादी वाचिक अथवा अभिनयात्मक कृति जी आपणास मनस्वी निखळ आनंद देते. वाचिक अर्थात शब्दात केलेली कीया जसे विनोद सांगणे वगैरे वगैरे तर अभिनयात्मक म्हणजे विविध वेशभूषा करून हावभाव केलेली कीया. जसे नकला करणे वगैरे वगैरे. सुखाचे प्रकार म्हणाल तर अनेक प्रकार आढळतील जसे ऐहिक सुख, भौतिक सुख, सामाजिक सुख, पारिवारिक अथवा कौटुंबिक सुख, शारिरिक सुख इ.इ.अशी सर्व सुखे एकाच वेळी भोगणारा फार क्वचितच आढळेल. कदाचित यास अनुसरूनच सुखी माणसाच्या सद-याची गोष्ट सांगितली जात असावी. असा सर्व सुखी मानवप्राणी या भुतलावर आढळणे दुरापास्तच. सबब गोष्ट ही गोष्टच राहते. समर्थ आपल्या मनाच्या श्लोकामध्ये म्हणतात " जगी सर्व सुखी असा कोण आहे. विचारी मना तुचि शोधून पाहे." ते उगाच नव्हे.

सुखी आयुष्याची पाच सुत्रे सांगीतली गेली आहे. ती अशी

१. उत्तम प्रकृति
२. पुरेशी संपत्ती
३. मर्यादित संतति
४. संतांची संगती
५. ईश्वराची भक्ती

शरीराला कोणतीही व्याधी अथवा कष्ट नसल्यास व शरीर निरोगी असल्यास सुखाची अपेक्षा करायची नसते सुख आपोआप लाभते. कारण शरीर सुखावले की मन प्रसन्न होते व सुखपण

आपोआपच प्राप्त होते. शरीर दुःखी असल्यास संपूर्ण लक्ष त्या दुःखाकडे जाते व सुख लोप पावते. नुसतेच शरीरा किंवा मन सुखावुन सुख मिळते असे नाही तर त्याच्या जोडीला पुरेशी संपत्ती असल्यास सुखास जोड मिळते. संपत्तीने देशभ्रमण करून आनंद मिळवू शकता दान धर्म करून आनंद मिळवता येतो. मन आनंदले म्हणजे सुखाची वाट अजून मोकळी होते. उत्तम प्रकृति आहे पुरेशी संपत्ती आहे म्हणून काय झाले जर संतति अधिक असल्यास संपत्ती त्यांच्या पालन पोषणामध्ये खर्ची पडते मग कुठले आले देश भ्रमण व दान धर्म. संपत्ती बरोबर आपला वेळ देखिल त्यांच्या देखभालीमध्ये खर्ची पडतो. पण हेच जर मर्यादित संतति असल्यास त्यांचे योग्य पालन पोषण करून उरलेला वेळ मुलाबाळांसहा देशभ्रमण करून सांसरीक व प्राकृतिक सुख उपभोगता येते. म्हणतात "सत्संगति सदा घडो सृजन वाक्ये कानी पडो" संसारात संसार सुखाला जेवढी किंमत आहे तेवढीच अध्यात्माला देखिल आहे व संसारात राहून संसार सुखा बरोबर अध्यात्म सुख हवे असल्या संतांची संगत आवश्यकच आहे. संत हितोपदेश करतात सुखाचे प्राप्तीचा सरळ सोपा मार्ग म्हणजे इश्वर भक्ती तो आपल्या किर्तन प्रवचनातून सांगतात. आपल्या दैनंदिन जिवनात थोडासा वेळ काढून परमेश्वराचे नामस्मरण केल्यास या जिवन मरणाच्या फे-यातून सूटका होउन मोक्ष प्राप्तीचा मार्ग मोकळा होते ज्याला परमानंद अथवा परमसुख म्हणता येईल.

संत ज्ञानेश्वर महाराज म्हणतात

" सुखी संतोषा न यावे। दुःखी विषादा न भजावे।
आणि लाभालाभ न धरावे। मनामाजी।"
ज्ञानेश्वरी अध्याय दुसरा श्लोक २६

अर्थात सुख प्राप्त झाले तर संतोष मानू नये ( सुखाने हुरळून जाउ नये )व दुःख प्राप्त झाले तर त्याबद्दल खेद मनू नये. लाभ हानीचा विचार मनात आणू नये.

सुख व दुःख या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. सुख आले म्हणजे त्यापाठोपाठ दुःख देखिल येते हे गृहित धरूनच चालावे. या बाबतीत अशी छोटीशी कथा सांगितली जाते. ती अशी.

नियती ही आई आहे. सुख व दुःख ही तिची दोन जुळी मुले आहेत. ती लहान असतांना त्यांचे सर्व सवंगडी फक्त सुखाशीच खेळत असत. दुःखाशी कोणी खेळण्यास तयार नसे. याचे दुःखाला फार वाईट वाटत होते. एक दिवस दुःख रडत रडत घरी आई जवळ आले व म्हणाले "आई सर्व जण सुखाशीच खेळतात माझ्याशी कोणी खेळतच नाही." आईला पण वाईट वाटले. तिने एक युक्ती केली. सुखाचे कपडे दुःखाला घातले व दुःखाचे कपडे सुखाला घालून दोघांना खेळायला पाठविले तर सर्वजण दुःखाला सुख समजून त्याचेशी खेळू लागले. सुखाशी कोणी खेळण्यास तयार होईना. मग सुख रडत आईजवळ आले व म्हणाले "सर्व दुःखाला सुख समजून दुःखाशी खेळतात माझ्याशी कोणीच नाही". आईची ही मात्रा लागू पडली व रोज सुख दुःखाला खेळावयाला पाठवतांना कधी सुखाचे कपडे दुःखाला तर दुःखाचे कपडे सुखाला असे करून पाठवित असे. यामुळे सर्व सवंगडी आता सुख दुःखाशी दोघांशी खेळू लागले.

हल्लीच्या जगात खरा सुखी तोच, जो दर आषाढी एकादशीला न चुकता पंढरपूरच्या पंढरीला भेटावयास पायी वारीने जाणारा वारकरीच म्हणावा. वारी करतांना तो आपले सर्व देहभान, प्रपंच, समाज सर्व काही विसरून विठ्ठलमय होतो. त्यास फक्त एकच आस असते, ती पंढरीच्या पांडूरंगाच्या दर्शनाची. त्यातच त्याचे सर्व सुख सामावलेले असते. त्यासाठी तो देहभान हरवतो त्याला उन, पाउस, वारा याची तमा नसते. जस जशी पंढरी जवळ येते तसतसे त्याचे मन भक्तीरसाने ओत प्रोत भरून वाहू लागते. एकदा का लाडक्या विठूरायाचे दर्शन झाले की, तो आनंदे नाचू लागतो. विठ्ठलमय होउन सारे जिवनाचे सुख अनुभवतो व सहजच मुखातुन अभंगाच्या पंक्ती येतात " मुख पाहता लोचनी सुख झाले हो साजणी".

शेवटी वारकरी हा पण मानवी देहच आहे. प्रपंचात अडकलेला प्रापंची. वारी संपली की तो परत आपल्या प्रपंचात पडतो व सुख दुःखाच्या भोवऱ्यात अडकतो. सर्वांच्या सुखासाठी आपण परमेश्वराकडे फक्त एकच मागणे मागू या! " सर्वेत्र सुखी नःसन्तु सवे सन्तु निरामया । सर्वे भद्राणी पश्यंतु मा कःश्चित दुःख माप्नुयात ॥"